# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/११/२०२५ (बुधवार )

## पोलीस असल्याची बतावणी करून दरोडा टाकणाऱ्या ७ आरोपीतांना खापा पोलीसांनी अवघ्या ४ तासात केले अटक

**पोलीस स्टेशन खापा** :— तक्रारदार नामे अंबर हरीप्रसाद साहु, वय २३ वर्ष, रा. ग्राम सावरी बजार ता. मोखेड, जि. छिंदवाडा यांनी तक्रार दिली की, १७/११/२०२५ चे रात्री ११/०० वा ते १२/०० वा दरम्यान यातील फिर्यादी आणि त्याचे साथीदार नामे प्रशांत शर्मा आणि माहवाहु वाहन क्रं एम.पी. २८ झेड जे. ७१६९ चा चालक आकाश पठारे असे रायपुर येथे मालवाहु वाहनामध्ये लाख घेवुन जात असतांना खापा जवळ पारिशवणी रोड कडे जात असातांना ६ अज्ञात आरोपीतांनी त्यांच्या गाडीला हात दाखवुन थांबविले. त्या अज्ञात अरोपीतांनी ते पोलीस असल्याचे सांगुन ते नाकाबंदी करीत असल्याचे भासविले. त्यांनी फिर्यादी आणि त्यांच्या साथीदारांचे मोबाईल तसेच वाहनाची चाबी काढुन घेतली. त्यांना चालन आकारले असे सांगुन त्यांच्या कडुन ३०००/— रूपये घेतले. आरोपीतांनी फिर्यादीची गाडी पोलीस स्टेशन येथे लावली लागेल असे सांगुन त्यांना आरोपीतांच्या कार मध्ये बसण्यास सांगितले. फिर्यादी आणि त्यांच्या सोबतच्यांनी बसण्यास नकार दिला असता त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीतांनी फिर्यादी आणि त्यांचा साथीदार प्रशांत शर्मा यांना त्यांच्या कार मध्ये बसविले. आणि मालवाहु वाहनाचा चालक आकाश पठारे याला वाहनाजवळ थांबविले. आरोपीतांनी त्यांची कार काही अंतरावर नेवुन फिर्यादी आणि प्रशांत शर्मा यांना मोबाईल परत देवुन सोडुन दिले. ते दोघे त्यांच्या मालवाहु वाहनाजवळ परत आल्यानंतर वाहनात लाखेच्या बोऱ्या नव्हत्या.तेव्हा आकाश पठारे यांनी सांगितले की, एक मालवाहु गाडी आली होती त्यातुन दोघे इसमांनी उतरून लाख त्यांच्या वाहनात टाकुन नेली. अशा प्रकारे अज्ञात ६ आरोपीतांनी फिर्यादी आणि त्यांच्या साथीदारांना जिवाने

मारण्याची धमकी देवुन दरोडा टाकुन त्यांच्या ताब्यातील ३० बोरी लाख किंमती ५,००,०००/— रुपये घेवुन गेल्याचे फिर्यादीवरून पोलीस स्टेशन खापा येथे कलम ३१०(२), २०४ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात खापा पोलीसांनी नमुद गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पथक तयार केले. नमुद पोलीस पथकाने कौशल्यपुर्ण तपास करत दिनांक १८/११/२०२५ रोजी अवघ्या ४ तासात आरोपी माहवाहु वाहन क्रं एम.पी. २८ झेड जे. ७१६९ चा चालक आकाश पठारे याला ताब्यात घेवुन कसुन चौकशी केली असता त्याने त्याचे ६ साथीदारांसह मिळुन सदर गुन्हा केल्याची केल्याची कबुली दिली. पोलीसांनी सदर प्रकरणात आरोपी १. अब्दुल हनीफ शेख, वय ३२ वर्ष, रा पवन गाव, पारडी, २. आकाश हिरालाल पठारे, वय २२ वर्ष, रा. भजई मोखेड, जि छिंदवाडा ३. आशिष उर्फ मराठा विनोद शर्मा, वय २४ वर्ष, रा. भरतवाळा, नागपुर,४. आकाश रमेश बोकडे, वय ३२ वर्ष, रा. कळमना, नागपुर,५. सुरज रमेश बोकडे, वय २३ वर्ष, रा. कळमना नागपुर, ६. बादल रमेश बोकडे, वय २८ वर्ष, रा. कळमना, नागपुर, ७. जितेंद्र किशेर लांभते, वय २४ वर्ष रा विनोबाभावे नगर, नागपुर यांना अटक केली आहे.

पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन गुन्हयात लाख नेण्याकरीता वापरलेले छोटा हाथी मालवाहुन वाहन क्रमांक एम.एच ४९ डी ३२४३ किंमती २,५०,०००/— रुपये , ३० बोऱ्या लाख किंमती ५,००,०००/— रुपये असा एकूण ७,५०,०००/— रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. नमुद आरोपीतांना मा न्यायालयाने दिनांक २१/११/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.




## "ऑपरेशन शोध – २" मोहीमेअंतर्गत नागपुर ग्रामीण पोलसांनी १८ हरविले पळविले बालकांचा घेतला शोध

मा. अपर पोलीस महासंचालक, महीला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशाने **संपुर्ण महाराष्ट्र राज्यात** दिनांक ०१/११/२०२५ ते १५/११/२०२५ रोजी पर्यंत **"ऑपरेशन शोध – २"** मोहीम राबविण्यात आली. या मोहीमे अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हा येथे हरविलेल्या/ पळविलेल्या प्रकरणांमधील बालकांचा शोध घेण्याकरीता विविध शोध पथके नेमुन यशस्वीरित्या मोहीम पार पाडण्यात आली. मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या मार्गदर्शनात या मोहिमेचे नेतृत्व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केले असुन AHTU (Anti Human Trafficking Unit) चे प्रमुख, पोलीस निरीक्षक श्री मिलींद तायडे आणि त्यांचे पथकांसह प्रत्येंक उपविभागात १ असे एकुण ६ मिसींग सेल स्थापन करण्यात आले. स्थापन केलेल्या विविध पथकांनी तांत्रिक पुरावे तसेच गुप्तबातमीदार यांच्या मदतीने हरविलेल्या/पळविलेल्या अल्पवयीन बालकांचा कसुन शोध घेतला.

**“ऑपरेशन शोध – २”** अंतर्गत दिनांक ०१/११/२०२५ ते १५/११/२०२५ रोजी पर्यंत सन २०२१ पासुन हरविलेल्या/पळविलेल्या १० अल्पवयींन बालकांचा शोध घेण्यात आला तसेच यानंतर सुध्दा सदर मोहीम मा.श्री हर्ष ए. पोद्‌दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या आदेशाने सुरूच ठेवुन अधिक ८ अल्पवयीन बालाकांचा शोध घेण्यात आला. **एकंदरीत एकुण १८ हरविलेल्या/पळविलेल्या अल्पवयीन बालकांचा शोध घेतला.** अशा प्रकाराची अल्पवयीन बालकांबाबतच्या प्रत्येक तक्रारीची नागपूर ग्रामीण पोलीस गंभीर दखल घेतात आणि मदतीस तत्पर असतात.

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी आगामी निवडणुक अनुषंगाने पोलीस स्टेशन रामटेक आणि पारशिवणी अंतर्गत प्रशासकिय अधिकारी यांची घेतली बैठक तसेच

## मतदान केंद्र,एस.एस.टी पॉईन्ट आणि स्ट्रॉग रूम ( Strong room ) येथे दिली भेट

आगामी नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आज दिनांक १९/११/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी रामटेक आणि पारशिवणी येथील प्रशासकिय अधिकारी यांची बैठक घेतली. रामटेक आणि पारशिवणी निवडणुक अधिकारी ,सहा. निवडणुक अधिकारी तसेच ईतर प्रशासकिय अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांची बैठक घेवुन आगामी निवडणुकीसंदर्भात दोन्ही स्ट्रॉग रूम सुरक्षेबाबत, मतदानाच्या दिवशी गर्दीचे नियोजन करून मतदान प्रक्रिया शांततेत तसेच सुरळीत पार पाडण्याबाबत सुचना दिल्या. तसेच मतमोजनी बाबत सुध्दा संबधीतांना योग्य सुचना दिल्या.


मा. पोलीस अधिक्षकांनी दोन्ही पोलीस स्टेशन हद्‌दीतील जास्त गर्दीचे तसेच मोठे मतदान केंद्राना भेट दिली तसेच रामटेक येथील नगर परिषद, स्ट्रॉग रूम, आणि पारशिवणी येथील तहसिल कार्यालय, स्ट्रॉग रूम , रामटेक एसएसटी आणि पारशिवणी अंतर्गत पेंच रोड, एसएसटी पॉन्ईटला भेट दिली. मा पोलीस अधिक्षकांनी स्वत: मतदान केंद्रांची पाहणी

करून मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या उपाययोजना तपासून घेतल्या. एसएसटी टीमच्या सदस्यांना सतर्क राहण्याच्या तसेच एसएसटी टीमने बेकायदेशीर हालचालींवर सर्तकतेने नजर ठेवावी आणि त्वरित कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच दोन्ही स्ट्रॉंग रूम चे सी.सी.टी.व्ही कॅमरे तसेच इतर सुरक्षा उपाययोजना तापासुन संबधीतांना योग्य सुचना दिल्या.

सदर भेटी दरम्यान मा.श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या सह श्री. प्रियेश महाजन,उपविभागिय अधिकारी, रामटेक श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, श्री कोळपे, तहसिलदार रामटेक, श्रीमती राउत ,मुख्याधिकारी रामटेक, श्री वाघचवरे, तहसिलदार, पारशिवणी, श्री. लुंगे मुख्याधिकारी पारशिवणी, पोलीस निरीक्षक, श्री अरविंदकुमार कतलाम, प्रभारी अधिकारी,रामटेक पोलीस स्टेशन ,पोलीस निरीक्षक, श्री राजेशकुमार थोरत, प्रभारी अधिकारी,पारशिवणी तसेच इतर प्रशासकीय अधिकारी हजर होते.






नागपूर ग्रामीण पोलीस




## लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. मौदा** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र. ७२१/२३ ७२१/२३ कलम ३७६(२)(एन),३५४ (ड),४५०,३४२,३२३,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, फिर्यादीचे पती बाहेरगावी कामासाठी गेले असता फिर्यादी ही तिचे दोन मुलांसह एकटीच राहत असतांना दिनांक २८/०३/२०२० रोजी यातील फिर्यादी ही तिच्या घरी हजर असतांना आरोपी नामे धम्मदिप उर्फ विक्की शिवराम चहांदे ,वय २६ वर्षे, रा . हनुमान नगर मौदा याने फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादी हीला मारहाण करून तिला जीवे मारण्याची धमकी देवुन तिचे वर लैंगिक अत्याचार केला.

श्रीमती संघमित्रा बांबोडे, पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन मौदा यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक १९/११/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र

न्यायधीश ०३ श्री एस.एच. ग्वालानी यांनी नमुद आरोपी धम्मदिप उर्फ विक्की शिवराम चहांदे ,वय २६ वर्षे, रा . हनुमान नगर मौदा **याला कलम ३७६(२)(एन) भादवि मध्ये १० वर्षे सश्रम कारावास व ५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास , कलम ४५० भादवि मध्ये १० वर्षे सश्रम कारावास व ५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास, कलम ३५४ (ड) भादवि मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ३ महीने साधा कारावास, कलम ३४२ भादिवी मध्ये ६ महीने साधा कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास, कलम ३२३ भादवि मध्ये ६ महीने साधा कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास, कलम ५०४ भादवि मध्ये ६ महीने साधा कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास, कलम ५०६ भादवि मध्ये ६ महीने साधा कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास, अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार विकास वाटकर, ब.नं १३२१ नेम पोलीस स्टेशन मौदा यांनी मदत केली आहे.

## साखळी पुरावे जोडत पोलीसांनी कळमेश्वर जळीत ट्रक प्रकरणात जनावरांचा पुरवठा करणाऱ्या २ आरोपींना केले अटक आतापर्यंत एकुण ७ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक १६/११/२०२५ रोजी पाहटे फेटरी येथे नागपुर ते काटोल रोडवर एक टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी ५०९४ याला आग आगल्याने एकुण २९ जनावरे मृत पावली होती. तसेच ८ गोवंश जनावरे जिवंत मिळुन आले होते. नमुद प्रकरणी पोलीसांनी आतापर्यंत ७ आरोपीतांना अटक केली असुन ५ आरोपी दिनांक २०/११/२०२५ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे. **सदर गुन्हयात साखळी पुरावे जोडत गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १८/११/२०२५ रोजी आरोपी मनोहर भोजराज मनघाटे, रा. सालेकसा जि. गोदींया याला सालेकसा येथुन ताब्यात घेतले. आणि आरोपी इख्तियार**

**कुरेशी मुश्ताक कुरेशी रा प्रवेशनगर, यशोधरा नगर, नागपुर याला यशोधरा नगर, नागपुर येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांकडे चौकशी केली असता आरोपी मनोहर भोजराज मनघाटे हा गोंदिया जिल्हयातुन अवैधरित्या जनावरांचा मागणी प्रमाणे पुरवठा करायचा तसेच आरोपी इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी हा अवैधरित्या जनावरे खरेदी विक्री मध्ये मध्यस्थी असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. दोन्ही आरोपीला अटक केली आहे. नमुद आरोपीतांना मा. न्यायालयाने दिनांक २१/११/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

## पोलीस ठाणे पारशिवणी हद्दीतील मौजा सत्रापुर जंगल शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पारशिवणी :—** दिनांक १८/११/२०२५ रोजी पारिशवणी पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा सत्रापुर जंगल शिवार येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन धाड टाकुन सुरू असलेल्या भट्टया नष्ट केल्या. **आरोपी नामे शिवशंकर उईके वय ४५ वर्षे, रा. कांद्री, ता. रामटेक जि नागपूर** याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १) ३०० लीटर मोहा दारू कीमंती ३००००/— रूपये २) ६४० लीटर मोहा सडवा किंमती ३२००० /— रूपये ३) दोन लाखंडी ४) चार लाखंडी पिंपे ५) हातभट्टचे ईतर साहीत्य असा **एकुण किमंती ६४,३५०/— रूपयांचा मुद्देमाल** मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २२ गुन्हे नोंद.

**दिनांक १८/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, तसेच ईतर साहीत्य असा एकुण ४,७७,२१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन सावनेर येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर

येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २२ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ४६८०मिली देशी दारू, २२६५ लीटर मोहाफुल दारू ४९६० लिटर सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण ४,७७,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## पारशिवणीत कायदा व सुव्यवस्था अबाधित

दिनांक १९/११/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात महीला उमेदवाराला खोलीत केले कैद अर्ज भरण्यापासुन रोखले पारशिवनीत तणाव या शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झालेली असुन सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, अशा प्रकारे कोणतीही घटना घडलेबाबत तक्रार नाही किंवा नेमण्यात आलेल्या बंदोबस्ताकडुन तसेच निवडणुक निर्णय अधिकारी यांचा कडुन सुध्दा नगर पंचायत कार्यालयात अशा कोणत्याही प्रकारची घटना किंवा कृत्य झालेले नसल्याचे सांगीतले.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**